**महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. पुणे (मेस्को)**
दुसरा मजला, रायगड इमारत, घोरपडी, पुणे – ४११००१
संपर्क :- ०२०-२६३०२६५९, मो. नं. ९३७३१६४९६२
ई मेल :- contact@mescoltd.co.in
मेस्को वेब साईट :- www.mescoltd.co.in

महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. पुणे (मेस्को) मध्ये भारतीय संरक्षण दलांतून निवृत्त झालेल्या माजी सैनिकांना खालील पदावर करार पध्दतीने नेमणूकीसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहे.

| अ. क्र | पदाचे नाव, पद संख्या व ठिकाण | नियुक्तीसाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| १ | **लिपिक - ५**<br>(i) मेस्को मुख्यालय - १<br>(ii) क्षेत्रीय कार्यालय पुणे - २<br>(iii) क्षेत्रीय कार्यालय नागपूर - १<br>(iv) क्षेत्रीय कार्यालय अमरावती - १ | १. उमेदवार सशस्त्र सेना दलांतील निवृत्त जेसीओ/ओआर आणि विधवा/युद्ध विधवा ज्यांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.<br>२. मराठी भाषेचे ज्ञान (बोलणे, लिहीणे, वाचणे) असणे आवश्यक आहे.<br>३. अकाऊंटिंग, एमएस-ऑफिस, मराठी आणि इंग्रजी टायपिंगचे मूलभूत ज्ञान अपेक्षित आहे व सोबत प्रमाणपत्र आवश्यक.<br>४. कार्यालयीन अधीक्षक/ मुख्य लिपिक स्तरावरील लिपिकांना प्राधान्य दिले जाईल.<br>५. शक्यतो मेडिकल कॅटेगरी SHAPE - I असावी.<br>६. महाराष्ट्र राज्यामध्ये नेमणूकीसाठी महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी प्रमाणपत्र आवश्यक.<br>७. उमेदवार सशस्त्र सेनादलांतून लिपिक पदावरून निवृत्त असलेस प्राधान्य.<br>८. मानधन मेस्कोच्या नियमानुसार दिले जाईल. |
| २ | **मेस्को पर्यवेक्षक - २**<br>क्षेत्रीय कार्यालय, पुणे - १<br><br>क्षेत्रीय कार्यालय, अमरावती - १ | १. उमेदवार सशस्त्र सेना दलांतून निवृत्त जेसीओ किंवा तत्सम पदाचा माजी सैनिक असावा व वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.<br>२. मराठी भाषेचे ज्ञान (बोलणे, लिहीणे, वाचणे) असणे आवश्यक आहे.<br>३. शक्यतो मेडिकल कॅटेगरी SHAPE - I असावी.<br>४. महाराष्ट्र राज्यामध्ये नेमणूकीसाठी महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी प्रमाणपत्र आवश्यक.<br>५. मानधन मेस्कोच्या नियमानुसार दिले जाईल. |
| ३. | **माहिती तंत्रज्ञान लिपिक – १**<br>महासैनिक औद्योगिक वसाहत भोसरी | १. उमेदवार सशस्त्र सेना दलांतील निवृत्त जेसीओ/ओआर आणि विधवा/युद्ध विधवा ज्यांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.<br>२. मराठी भाषेचे ज्ञान (बोलणे, लिहीणे, वाचणे) असणे आवश्यक आहे.<br>३. अकाऊंटिंग, एमएस-ऑफिस, मराठी आणि इंग्रजी टायपिंगचे मूलभूत ज्ञान अपेक्षित आहे व सोबत प्रमाणपत्र आवश्यक.<br>४. शक्यतो मेडिकल कॅटेगरी SHAPE - I असावी.<br>५. महाराष्ट्र राज्यामध्ये नेमणूकीसाठी महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी प्रमाणपत्र आवश्यक.<br>६. उमेदवार सशस्त्र दलाच्या तांत्रिक शाखेतून कम्पुटर हार्डवेअर व सॉफ्टवेअरचे काम करून निवृत्त झालेला असावा.<br>७. उमेदवार टॅली सॉफ्टवेअर (TALLY SOFTWARE) शी परिचित असावा किंवा खाते लिपिकाचे काम केलेला असावा.<br>८. कायदा शाखेचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.<br>९. उमेदवारास सी सी टी व्ही हाताळणे, देखभाल, दुरूस्तीचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>१०. मानधन मेस्कोच्या नियमानुसार दिले जाईल. |

**वरील पदासाठी अटी व शर्ती :-**

१. सदर पदावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरूपातील करार पध्दतीवरील राहील. उमेदवारास कोणत्याही प्रकारच्या स्थायी पदासाठी दावा करता येणार नाही. तसेच करार कालावधीतील सेवा नियमित करण्याचा कोणताही हक्क राहणार नाही.

२. करार पध्दतीवरील नियुक्त केलेल्या कालावधीतील उमेदवाराचे कामकाज असमाधानकारक आढळल्यास व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने १ महिन्याची नोटीस देवून त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

३. सदर पदावर नियुक्त झालेल्या उमेदवाराची कोणतीही विभागीय चौकशी अथवा पोलीस गुन्हा दाखल असता कामा नये.

४. सदर पदावरील नियुक्तीचा कालावधी ३६० दिवसाचा राहील.

५. निवड झालेल्या उमेदवारांना महामंडळाचे कामकाज हे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसारच करावे लागेल.

६. भारतीय सेनादलांतून स्वेच्छा/सेवानिवृत्तीनंतर मेस्को/शासनामध्ये यापूर्वी पुनर्वसन झाले नाही त्यांना प्रथम प्राधान्य राहील.

७. पात्र झालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी ईमेल व्दारे लेखी पत्र किंवा दूरध्वनीव्दारे बोलविण्याची कार्यवाही केली जाईल.

८. वरील निवड करावयाच्या पदाचा विहित नमुन्यातील अर्ज व त्यासोबत आवश्यक कागदपत्रे जोडण्यात यावेत.

९. अर्ज स्विकारणे / नाकारणे किंवा रद्द करणे याबाबतचे निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांनी राखून ठेवलेले आहेत.

१०. पात्र उमेदवारांनी आपले अर्ज या कार्यालयात संपूर्ण माहितीसह ईमेलवर वा प्रत्यक्ष किंवा पोस्टाने दिनांक **२६ जुलै २०२५** पर्यंत पाठवावेत. या तारखेनंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

११. अर्ज करण्याचा नमुना मेस्को वेब साईट www.mescoltd.co.in वर पाहावा.

१२. उमेदवारांनी ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाच्या स्थाना अनुसार खालील ठिकाणी ई मेल वर आपले अर्ज पाठवावेत:-

| | | | |
|---|---|---|---|
| (क) | मेस्को मुख्यालय, पुणे | - | contact@mescoltd.co.in |
| (ख) | महासैनिक औद्योगिक वसाहत, भोसरी | - | msiepune@mescoltd.co.in |
| (ग) | क्षेत्रीय कार्यालय, पुणे | - | ro-pune@mescoltd.co.in |
| (घ) | क्षेत्रीय कार्यालय अमरावती | - | ro-amravati@mescoltd.co.in |
| (ङ) | क्षेत्रीय कार्यालय नागपूर | - | ro-nagpur@mescoltd.co.in |

**श्री सुनिल बालाजीराव महिंद्रकर (भा.प्र.से)**
**व्यवस्थापकीय संचालक, मेस्को, पुणे**

महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. पुणे (मेस्को) येथे सेवानिवृत्त माजी सैनिक उमेदवारांनी "________________" (पदाचे नांव) या पदावर करार पध्दतीने नियुक्तीबाबतचा विहित नमुन्यातील अर्ज

उमेदवाराचा
फोटो
स्वाक्षरीसह

| अ.क्र. | मुददा | तपशिल |
|---|---|---|
| १. | संपूर्ण नाव | |
| २. | ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नाव व ठिकाण | |
| ३. | शैक्षणिक अर्हता | |
| ४. | जन्म दिनांक | |
| ५. | सध्याचे वय | |
| ६. | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद व ट्रेड | |
| ७. | सेवाकालावधी व सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| ८. | सध्या मिळणारे सेवानिवृत्ती वेतन (महागाई भत्त्यासह) | |
| ९. | विभागीय चौकशी / पोलीस गुन्हा दाखल आहे किंवा कसे | |
| १०. | ई-मेल | |
| ११. | मोबाईल नंबर | |
| १२. | पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| १३. | रहिवाशी (Domicile) प्रमाणपत्र आहे किंवा कसे | |

मी प्रतिज्ञापूर्वक नमुद करतो की, वरील माहिती सत्य आहे. सदरचे काम करार पध्दतीने करण्यासाठीची जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून नमुन्यातील अटी व शर्ती मला मान्य आहेत. ही माहिती चुकीची अगर खोटी आढळल्यास होणा-या कारवाईस मी स्वत: जबाबदार राहील याची मला जाणीव आहे.

ठिकाण :
दिनांक :

(उमेदवाराचे नांव व स्वाक्षरी)

सोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी ( ) खुण करावी:-

(i) जिल्हा सैनिक कार्यालयाकडून मिळालेले माजी सैनिक ओळखपत्र (ii) माजी सैनिक सेवा पुस्तक (महत्वाची पाने) (iii) शैक्षणिक प्रमाणपत्र (iv) पेन्शन पेमेंट ऑर्डर (v) रहिवाशी (Domicile) प्रमाणपत्र (vi) अतिरिक्त पात्रता प्रमाणपत्रे (vii) ________________